नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीची विशेष 2015

बुधवार, दि. 09.12.2015 रोजी सकाळी 10.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर निवड करण्यासाठी **स्थायी समितीची विशेष सभा, सुरेश काकाणी, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहामध्ये भरविण्यात आली होती.**

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन खालील स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सर्व श्री / श्रीमती.**

1 मोरे संजय गंगाधरराव
2 आनेवार गंगासागर संदिप
3 घोगरे इंदूबाई शिवाजीराव
4 बियाणी प्रविण बालाप्रसाद
5 शर्मा पुष्पाताई राजेश,
6 इशरत फातेमा अ.शमीम,
7 कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम,
8 कदम गंगाबाई नारायणराव
9 चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह
10 अनुजा अमितसिंह तेहरा
11 फारुख हुसेन कासीम साब,

**खालील स्थायी समितीचे सदस्य अनुपस्थितीत होते.**

**सर्व श्री / श्रीमती**

1) गुर्रम विनयकुमार जगदिश
2) राओत्रे संगिता पृथ्वीराज
3) ज्योती महेंद्र खेडकर
4) सलिमा बेगम नुरुल्लाखान
5) जकिया बेगम स. मुखतार

**विषय क्र. 1 :-**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 (1) व शासन अधिसुचना क्र. बिएनएम/5007/ प्रक्र.15/नवि-32 दिनांक 17 फेब्रुवारी 2007 व शासन अधिसुचना क्र. बिएनएम/2008/ 295/प्रक.106/2008/नवि-32 दिनांक 12 डिसेंबर 2008 मधील नियम 4 (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणुक घेणे) मधील तरतुदीनुसार स्थायी समितीच्या निर्वाचीत (16) सदस्यांमधून स्थायी समितीच्या सभापतीची निवड करणे बाबत.**

नगरसचिव

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 (1) आणि स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम, 2007 चे नियम 2(2) चे सुधारीत तरतुदी प्रमाणे मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेशी विचार विनिमय केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्याकरीता या समितीची विशेष सभा घेण्यासाठी दिनांक 9.12.2015 ही तारीख निश्चित करण्यात आली. स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे सुधारीत नियम, 2008 चे नियम 4 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा. विभागीय आयुक्त यांनी आजच्या स्थायी समितीच्या विशेष सभेसाठी त्यांचे आदेश क्रं. 2015/नपाप्र/आस्था-2/कावि, दिनांक 01.12.2015 अन्वये त्यांचे प्रतिनिधी म्हणून मा. श्री सुरेश काकाणी, जिल्हाधिकारी, नांदेड यांना पिठासिन अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21 (1) आणि महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 मधील तरतूदीनूसार स्थायी समितीच्या सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दि.04.12.2015 रोजी निवडणूक कार्यक्रमासह सभेची नोटीस निर्गमित करण्यात आली होती. त्यानुसार दि. 08.12.2015 पर्यंत नामनिर्देशनपत्र वाटप करणे व स्विकारण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून निर्दिष्ट कालावधीत म्हणजे दिनांक 08.12.2015 रोजी दुपारी 3.00. वाजे पर्यंत स्थायी समिती सभापती पदासाठी सौ. अनुजा अमितसिंह तेहरा या एकच उमेदवाराचे दोन नामनिर्देशनपत्रे प्राप्त झालीं असून ते छाननीसाठी मा. प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

**पिठासीन अधिकारी** स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे नियम, 2007 चे नियम क्र. 5 अन्वये स्थायी समितीच्या सभापती पदासाठी **सौ. अनुजा अमितसिंह तेहरा यांचे दोन नामनिर्देशनपत्रे** प्राप्त झाली असून या दोन्ही नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येत आहे.या दोन्ही नामनिर्देशन पत्राबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास लेखी अथवा तोंडी द्यावा तथापि उपस्थितापैकी कोणीही आक्षेप दाखल केलेला नाही.सौ. **अनुजा अमितसिंह तेहरा** यांचे एका नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणून ईशरत फातेमा अ. शमीम व अनुमोदक म्हणून चव्हाण उमेशसिह अशोकसिंह तर दुस-या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून आनेवार गंगासागर संदीप व अनुमोदक म्हणून कदम गंगाबाई नारायणराव हे आहेत दोन्ही नामनिर्देशन पत्रावर उमेदवारांच्या व त्यांच्या सूचक व अनुमोदकांच्या स्वाक्ष-या असल्यामूळे **सौ. अनुजा अमितसिंह तेहरा** यांचे दोन्ही नामनिर्देशनपत्रे वैध ठरली आहे.

**पिठासीन अधिकारी** **सौ. अनुजा अमितसिंह तेहरा** यांच्या उमेदवारी बाबत कोणीही आक्षेप घेतलेला नसल्यामुळे घोषित करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानूसार वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारास आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल तर त्यांना उमेदवारी परत घेण्यासाठी 15 मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. म्हणजेच 10.08 ते 10.23 वाजे पर्यत आपली उमेदवारी परत घेता येईल.

**पिठासीन अधिकारी** स्थायी समिती सभापती पदाचे **उमेदवार सौ. अनुजा अमितसिंह तेहरा** यांनी आपली उमेदवारी परत घेतलेली नसल्यामुळे **स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती आणि उपसभापती यांची निवड घेणे नियम 2007 चे नियम क्रं. 6 (1) नुसार स्थायी समितीच्या सभापतीपदी सौ. अनुजा अमितसिंह तेहरा याची वैधरीतीने बिनविरोध निवड झाल्याचे मी, सुरेश काकाणी, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड घोषीत करतो. आजच्या स्थायी समितीच्या विशेष सभेचे कामकाज शांततेत पार पाडण्यास सहकार्य केल्याबद्दल सर्व स्थायी समितीचे आभार मानून आजची विशेष सभा संपल्याचे जाहिर करतो**

**स्वाक्षरीत/-**

( सुरेश काकाणी )

पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड

स्थायी समिती सभापती निवडणूक 2015

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड